Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA**
**CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION**
**PHONE : – 2609105, 2609451, 2609452**
www.unishivaji.ac.in, e-mail: cde_sim@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४, महाराष्ट्र**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९१०५, २६०९४५१, २६०९४५२
www.unishivaji.ac.in, e-mail: cde_sim@unishivaji.ac.in


जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/355A    दिनांक : 10 JUL 2024

प्रति,
डॉ. श्रीमती संजीवनी महाले,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणानजीक, गोवर्धन, नाशिक,
जि.नाशिक

विषय : दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणाबाबत.

महोदया,

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातंर्गत गुणवत्ता हमी केंद्रासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक दि. १९/०५/२०२३ रोजी मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंदामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून मध्ये तयार करण्यात आलेल्या स्वयंअध्ययन साहित्याचे आपणाकडून व आपण नामनिर्देशित केलेल्या तज्ञांकडून त्रयस्थ तज्ञ परीक्षक म्हणून परीक्षण करुन घेण्यात यावे असा ठराव समंत झाला आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ मधील स्वयंअध्ययन साहित्याची यादी सोबत जोडली आहे. सदर यादीतील आपणाकडून परीक्षण करण्यात येणाऱ्या स्वयंअध्ययन साहित्याची माहिती या केंद्रास कळवावी जेणेकरुन संबधित स्वयंअध्ययन साहित्याची प्रत आपणाकडे परीक्षणासाठी पाठविण्यात येईल व उर्वरीत स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणासाठी तज्ञांची नावे (पत्ता व मोबाईल नंबरसह) या केंद्रास सूचित करावीत, ही विनंती. सदर परीक्षण करणाऱ्या तज्ञांना प्रत्येक स्वयंअध्ययन साहित्याच्या परीक्षणासाठी प्रत्येकी रुपये एक हजार याप्रमाणे मानधन आदा करण्यात येईल.

आपला विश्वासू

संचालक

सोबत : वरीलप्रमाणे